**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२५९/२०२६**

निशाण क्र.

MHSI080004792026

भारतीय नागरीक सुरक्षा संहितेमधील प्रकरण २१ प्रमाणे आरोपीची संक्षिप्त संपरिक्षा कणकवली येथील **शुभम जी. लटुरिया, न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कणकवली** यांचे न्यायालयात

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याचा दिनांक | – | २५/०५/२०२६ |
| २. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | – | ०१/०६/२०२६ |
| ३. फिर्यादिदाराचे नाव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इत्यादी. | – | वर्षा बजरंग मोहिते, सपोफौ/९३८, जिल्हा वाहतुक शाखा सिंधुदुर्ग, जि.सिंधुदुर्ग. |
| ४. आरोपीचे नाव, त्यांचे वय व त्यांचे निवासस्थान इत्यादी. | – | अवदुत सुरेश राणे, |

५. गुन्हयाची हकीकत – दि. २५/०५/२०२६ रोजी २३.०० वाजताचे मानाने गांगोमंदीर, ता.कणकवली येथे तुम्ही आपले ताब्यातील वाहन क्र.एमएच०७–के–०३६० हे कणकवली शहर ते गांगो मंदीर असे घेऊन जात असताना सदर वाहन मद्यसेवन करुन अनियंत्रीतपणे चालवित असताना मिळून आलात आणि त्यायोगे मोटार वाहन कायदा कलम १८५ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केलात.

६. **आरोपीचे प्रतिकथन** –

प्र.क्र.१ : तुम्हाला कागदपत्राच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्र.क्र.२ : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला आरोप समजला काय?

उत्तर : होय.

प्र.क्र.३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?

उत्तर : होय. मला गुन्हा कबूल आहे.

दिनांक: ०१/०६/२०२६ ------------

**आरोपीची सही/अंगठा**

समक्ष,

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2026.06.01 15:29:58 +0530

न्यायदंडाधिकारी वर्ग–१,

कणकवली

आरोपीस गुन्हयाबाबतचा तपशील वाचून दाखविला व मराठीत समजावून सांगितला.

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2026.06.01 15:30:02 +0530

दिनांक:०१/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१,

कणकवली.

**न्यायनिर्णय**

प्रतिकथनातील मजकूर आरोपीस मराठी भाषेत समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबूल असल्याचे सांगितले. आरोपीस खालील बाबी समजावून सांगितल्या.

(अ) मोटर वाहन कायदा कलम १८५ अन्वये सहा महिने कारावास किंवा रुपये दहा हजार द्रव्यदंड किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतूद आहे.

(ब) आरोपीने गुन्हयाची कबूली दिल्यास त्याला खटल्याच्या चौकशीचा अधिकार सोडून द्यावा लागेल.

(क) आरोपी गुन्हयाची कबूली देणेस बंधनकारक नाही. तरी देखील त्याने गुन्हयाची कबूली दिल्यास त्याच्याविरुध्द दोषी असल्याचे कागदोपत्री नोंद होईल.

(ड) जर त्याने गुन्हा कबूल केला तर अपील करण्याचा त्याचा हक्क संपुष्टात येईल.

गुन्हयाच्या कबूलीचे परिणामाची जाणीव करुन देखील गुन्हा कबूल करणार असल्याचे त्याने प्रतिपादन केले. अशा परिस्थितीत त्याने दिलेली गुन्हयाची कबूली ही

स्वेच्छेने व विनादडपण दिलेली आहे याची मला खात्री झाली आहे. सबब, मी त्याची कबूली स्वीकारुन त्याला दोषी धरत आहे. शिक्षेबाबत आरोपीस विचारले असता त्याने या गुन्हयाबाबत पश्चाताप होत असल्याचे सांगून पुन्हा अशा प्रकारचा गुन्हा करणार नाही असे सांगितले. आरोपीचे प्रतिकथन व गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता पुढीलप्रमाणे आदेश करणे न्यायोचित होईल असे माझे मत आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी अवदुत सुरेश राणे याला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७५ अन्वये मोटार वाहन अधिनियम कलम १८५ च्या शिक्षापात्र गुन्हयाकरीता रक्कम रुपये १०,०००/– ( रुपये दहा हजार फक्त ) द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

२. आरोपीने दंड न भरल्यास त्यास दहा दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते.

३. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस मोफत देण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला. )

SHUBHAM GOVIND LATURIYA Digitally signed by SHUBHAM GOVIND LATURIYA Date: 2026.06.01 15:30:07 +0530

( शुभम जी. लटुरिया )

दिनांक – ०१/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग – १, कणकवली.